
कळसुबाई
एक अविस्मरणीय क्षण
शुभम खोत

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

शुभम खोत

लिखित

# कळसुबाई

## एक अविस्मरणीय क्षण

# कळसुबाई

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कळसुबाई (ट्रेकवर्णन)


## शुभम खोत

पत्ता:- रा:- पानगाव, तालुका:- कळंब,

जिल्हा:- उस्मानाबाद. पिनकोड:-४१३५२५

फोन नंबर:- ९५५२०७०५६२ /८३२९६६७७६२

shubhamkhot1507@gmail.com



या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १३ सप्टेंबर २०१८(श्रीगणेशचतुर्थी)

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

## (अहमदनगर-राजूर-रांधा फॉल-भंडारदरा-बारी)

शुभम खोत

shubhamkhot1507@gmail.com

९५५२०७०५६२


**उंची:-** ५४०० फुट

**शिखर चढण्यासाठी लागणारा वेळ:-** तुम्ही जर प्रोफेशनल ट्रेकर नसाल तर जवळपास अडीच तास.

**पोहोचण्याचा मार्ग:-** नाशिक इगतपुरी महामार्गावर घोटी गावापासून भंडारदरा च्या दिशेने गेल्यास बारी हे गाव  लागेल, याच बारी गावातून तुम्हाला तुमच्या ट्रेकची सुरवात करायची आहे.

**अतोनात कष्ट करून मला**
**घडवलेल्या, आणि माझ्या**
**आयुष्यातल्या प्रत्येक सुख**
**दुःखाच्या क्षणात खंबीरपणे**
**माझ्या सोबत असलेल्या**
**तीर्थरूप जन्मदात्यांच्या चरणी**
**सप्रेम अर्पण.**

**तसेच माझ्या प्रवासात**
**सोबती लाभलेल्या**
**माझ्या सर्व इंजिनीअर**
**भावासम मित्रांना सप्रेम**
**अर्पण**


प्रजापती, अधिपती,
सर्वगुणसंपन्न, रयतेचा
राजा शिवछत्रपतींना,
आणि सह्याद्रीच्या
कडेकपरींना त्रिवार
मनाचा मुजरा
शुभम खोत



**कविता करणं आणि सतत काहीतरी लिहीणं हा माझा छंद, हा छंद कधी लागून गेला कळलचं नाही. काही दिवसापूर्वी आयुष्यात कोणी तरी आलं आणि माझ्या कवितेची सुरवात झाली, मग हळू हळू काहीतरी लिहावसं वाटू लागलं. आणि शेवटी माझं हे कळसुबाईच्या भटकंती वर म्हणजेच प्रवासवर्णनावर आधारित पाहिलं पुस्तक मी लिहीलं. नव्याने कळसुबाई च्या दर्शनासाठी सह्याद्रीच्या दिशेने जाणाऱ्या गिर्यारोहण प्रेमीना नक्कीच उपयोगी पडेल अशी अपेक्षा, तुमच्या प्रतिक्रिया नक्कीच कळवा.**

**लेखक:- शुभम खोत**

**(BE Mechanical)**

लेखकाचा परिचय,

नाव:- शुभम सुभाष खोत.

शिक्षण:- मेकॅनिकॅल इंजिनीअर

छंद:- लेखन,वाचन, ट्रेकिंग ,कविता करणे,

स्वप्न:- हे माझं पहिलंच प्रवास वर्णनावरील पुस्तक असून भविष्यात कथा, कादंबरी, आणि कवितासंग्रह घेऊन तुमच्या भेटीला येईल.

पत्ता:- रा:- पानगाव, तालुका:- कळंब, जिल्हा:- उस्मानाबाद. पिनकोड:-४१३५२५

फोन नंबर:- ९५५२०७०५६२ /८३२९६६७७६२

# कळसुबाई

## एक अविस्मरणीय क्षण

तसं पाहायला गेलं तर गिर्यारोहणाचा अनुभव मला याआधी कधीच नव्हता. पण केवळ इतर गिर्यारोहकांचे अनुभव वाचून आणि जीवन कदम यांचे विविध गिर्यारोहणाचे व्हीडीओ पाहून मला सुद्धा गिर्यारोहणाचा चांगलाच नाद लागल्याचं माझ्या लक्षात आलं. "गिर्यारोहण अर्थातच ट्रेकिंग इज माय पॅशन" हे माझं स्टेट्स कधी होऊन गेलं समजलंच नाही, पण थेट ट्रेकिंगचा अनुभव कधी घेतलाच नव्हता, खूप दिवसापासून मनात विचार घोळत होता,........ "नाही, काही झालं तरी या वर्षी मात्र ट्रेकिंग ला जायचंच."

पण ' नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्नं ' म्हणल्यासारखी माझी गत झाली होती. काही ना काही अडचणी जरूर यायच्या. आणि या वेळेस हि तसंच झालं. मनातली कल्पना चार मित्रांसमोर मांडली आणि मित्रांनीही तयारी दर्शवली, पाहता पाहता बाकीची मंडळीही तयार झाली, आणि शेवटी दिवस ठरला..... २० जुलै २०१८

आत्ता या वेळेस नक्की काय अडचण येईल हे मात्र माहित नव्हतं, कारण अत्तापर्येंतचं नियोजन एकदम व्यवस्थित पार पडलं होतं. अगदी माझ्याच सारख्या येड्या फिरस्ती टाळक्यांचा ग्रुप तयार होण्यापासून ते गाडी आणि दिवस ठरवण्यापर्येंत. आणि झालं. ज्या गोष्टीची आतुरतेने वाट पाहत होतो ते शेवटी झालंच, ठरलेल्या ग्रुप मेंबरपैकी दोन मेंबर काही कारणामुळे येऊ शकत नव्हते, थोडीशी अस्वस्थता वाढली होती. आणि याच अस्वस्थतेत आणखी एक भर पडली ती म्हणजे ठरवलेली गाडी रद्द झाली, अगदी १९ जुलै ची रात्र ठरलेल्या प्लान प्रमाणे २० जुलै ला पाहटे तीन वाजताचं प्रस्थान पण .......... गाडीच नाही, आत्ता मात्र आमची चांगलीच फाटली होती. सगळ्यांना वेळ आणि भेटण्याचे ठिकाण सांगितलं होतं, आणि अचानक ठरवलेली गाडी रद्द झालेली. काही केल्या गाडीची व्यवस्था होत नव्हती, माझा मित्र शुभम ( तो पण शुभम आणि मी पण शुभम ) आणि मी रात्री बारा वाजेपर्येंत कोणाला न कोणाला फोन घुमवत होतो, दोघांचे हि चेहरे पडलेले.

आत्ता काय करायचं ......?????????

मी ठरवलं आत्ता शेवटचा प्रयत्न करायचा, गाडी भेटली तर जायचं नाहीतर गुपचूप पांघरुणात तोंड खुपसून निवांत झोपून जायचं.

आणि शेवटचा फोन घुमवला...

मनाच्या कोपऱ्यात अजूनही अपेक्षा होतीच, कारण वेड आणि नाद शांत बसू देत नव्हता. " नाद केला पण वाया गेला " अस व्हायला नको होतं. आणि कदाचित देवाच्या मनात असावं, क्षणातच गाडी मालक तयार झाला. त्यालाही ठरलेली वेळ सांगून दिली. आत्ता कुठं डोक्यावरचं भलं मोठं ओझं कमी झाल्यासारखं वाटलं, आणि सुटकेचा निश्वास सोडला.

पण झोप काही लागत नव्हती, कारण सह्याद्रीची शिखरं मला हिणवत होती ...... जणू मला आव्हान देत होती.

काही गोष्टी ठरलेल्या वेळेत कधीच होत नसतात, त्याचप्रमाणे आम्हालाही उशीर झालाच. ठरलेली वेळ पहाटे २ वाजून ४५ मिनिटांची, मात्र आमच पालखी प्रस्थान झालं पहाटे ४ वाजता. उत्सुकता एवढी वाढली होती की रात्री क्षणभर सुद्धा डोळा लागला नव्हता. एक नवीन सुरवात करत होतो, डोळे झाकताच डोळ्यासमोर दिसत होता तो म्हणजे महाराष्ट्राचा माउंट एवरेस्ट................

होय , आम्ही निघालो होतो महाराष्ट्राच्या एवरेस्टच्या दिशेने, अर्थातच कळसुबाई ......



अहमदनगर जिल्ह्यात असलेल सह्याद्रीच्या कुशीतलं हे सर्वात उंच शिखर. ग्रुपमधील सर्वच मेंबर ची ट्रेकिंग ची हि पहिलीच वेळ. आणि सुरवातीलाच कळसुबाईच एक आव्हान आमच्या समोर होतं. सुरवात करायचीच आहे तर ती साधी नाही, काहीतरी रोमांचकारी झालंच पाहिजे. ग्रुपमधील बहुतेक जणांना कळसुबाईच्या उंचीचा अंदाज होताच, पण ते आव्हान पेलण्याची प्रत्येकाची तयारी होती. “हे तर मी पण करू शकतो” अशी सकारात्मक भावना प्रत्येकाच्या मनात होती.

बघता बघता सूर्याची किरणं सह्याद्रीच्या डोंगररांगेतून वाट काढत पृथ्वीवर पडत होती, तर काही किरण सह्याद्रीन स्वताच्या अंगावरच अडवून धरली होती, आणि यामुळेच कि काय अंधुकसा प्रकाश आणि अंधाराचा लपंडाव पहावयास मिळाला. वेळ होती पहाटे साडे सहाची, आम्ही राजूर गावात पोहोचलो होतो, पावसाचा जोर आणि पडत्या पावसात बोचऱ्या थंडीचा प्रभाव वाढतच होता. शिखरावर जायचं म्हटल्यावर चालून चालून भूक नक्कीच लागणार, याच भुकेचा बंदोबस्त करण्यासाठी राजूर गावातूनच आम्ही फरसाणाचे दोन पुडे सोबत घेतले. शिखरावर बसून देशी फरसाण खाण्याचा वेगळाच आनंदही मिळणार होता हे मात्र नक्की, कारण भरपेट जेवण करून शिखरावर चढणं कदापीही शक्य नव्हतं.

राजूर गावापासून थोड्याच अंतरावर रांधा फॉल लागतो. प्रवरा नदीवर असलेला हा रांधा फॉल पावसाळ्यामध्ये आणि हिवाळ्याच्या काही दिवसात पर्यटकांचे लक्ष वेधून घेतो. १७० फुट उंचीवरून दरीत कोसळणारे पाणी, आणि याच कोसळणाऱ्या पाण्याचा कानास पडणारा अद्भुत आवाज डोळ्यांची पारणे फेडतो.



रांधा फॉल वर उतरल्यानंतर सगळ्याचं फोटो शूट सुरु झालं, कोणी स्लो मोशन व्हिडीओ बनवायचं, तर कोणी वेगवेगळ्या पोज देऊन फोटो काढत असायचा. जास्त वेळ इथं

घालवता आला नाही , कारण लवकरात लवकर कळसुबाई गाठायचं होतं.



रांधा फॉल पासून अवघ्या ९ किलोमीटर अंतरावर पश्चिम घाटातील भंडारदरा धरण खरोखरच विलोभनीय आहे. अकोले तालुक्यातील शेंडी या गावाजवळ पश्चिम घाटात सह्याद्रीच्या सौंदर्यात आणखी भर पडणारे हे भंडारदरा धरण.





मुळा, प्रवरा, आढळा, म्हाळुंगी, इ. नद्यांच्या खोऱ्यांची पाठराखण करीत गगनास भिडणारी उत्तुंग अशी सह्याद्रीची शिखरे, अश्या या अप्रतिम सौंदर्याने नटलेला हा भाग तुम्हाला नक्कीच प्रेमात पाडेल.

इ. सन १९०१ ते १९२४ या ब्रिटीशांच्या काळात बांधण्यात आलेल्या भंडारदरा या धरणाचे मूळ नाव हे विल्सन डॅम असून त्याच्या जलाशयास आर्थर लेक असे संबोधिले जाते. हाच आर्थर लेक वेगवेगळ्या ऋतूमध्ये विविध देशी-विदेशी पक्ष्यांना आकर्षित करतो. साहजिकच भंडारदरा धरणावर सुद्धा जास्त वेळ घालविता नाही आला, कळसुबाई ची ओढ लागली होती.



शेवटी कळसुबाई च्या पायथ्याशी येऊन पोहोचलो. सकाळचे ९ वाजून ४५ मिनिट झाली होती. पायथ्या पासून कळसुबाईचं विहंगमय दृश्य अगदीच शोभून दिसत होतं. हे दृश्य पाहून अगदीच कोणीही निसर्ग्याच्या प्रेमात पडू शकतो. पायथ्याला महादेव कोळी समाजाची अदिवाशी वस्ती पहावयास मिळते, माझ्या मते परीस्थीतीशी दोन हात करायला याच लोकांकडून शिकायला हवे. उतरत्या छप्पराच्या झोपड्या आणि चिखलाच्या पाऊलवाटा खरोखरच गगनात भिडणाऱ्या इमारतींना आणि महामार्गांना लाजवत होत्या.





शिक्षणासाठी दोन चार मैल पडत्या पावसात चिखल तुडवत चालत जाणारी शाळकरी मुलंही तुम्हाला पाहवयास मिळतील. नशिबी एवढे दु:ख असूनदेखील त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळंच हसू आणि मनामध्ये दृढ इच्छाशक्ती पहावयास मिळेल. हे सर्व पाहून मनामध्ये विचार डोकवायचा ....... आपल्याला एवढ्या सोई सुविधा असून देखील आपण सतत आपल्या नशिबाला दोष देत असतो.

येथील आदिवाशी लोकांचा उदरनिर्वाह हा पूर्णपणे शेतीवर चालतो, जोडधंदा म्हणून या लोकांनी शिखरावर ठिकठिकाणी पर्यटकांच्या सोयीसाठी हॉटेल उभारलेली आहेत, शिवाय येणाऱ्या पर्यटकांना गाईड करणे व त्यांच्या जेवणाची उत्तम व्यवस्था करणे यातून देखील त्यांच्या उदरनिर्वाहासाठी हातभार लागतो. सततच्या पावसामुळे जमिनीत भरपूर प्रमाणात पाणी साठून राहते म्हणूनच या भागात प्रामुख्याने भाताचे पिक घेतले जाते.





शिखराच्या पायथ्याशी बारी नावाच छोटेखाणी गाव लागत, अगदीच जेमतेम म्हणजे १५० ते २०० लोकवस्ती. उतरत्या छपराची घरे मात्र तुमच लक्ष वेधून घेतील. बारी गावात पोहोचण्यासाठी दोन मार्ग आहेत, नाशिक इगतपुरी महामार्गावर घोटी हे गाव लागेल, घोटी या गावातून घोटी- भंडारदरा रस्त्यावर, भंडारदरा पासून ६ किलोमीटर अंतरावर बारी गाव आहे. किंवा संगमनेर मार्गे सुद्धा बारी गावामध्ये पोहोचता येते. शेजारीच "कळसुबाई हरीश्चंद्रगड" अभयारण्य आहे. तसेच आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाचे "समुद्रनाला" हे घनदाट जंगलही याच भागात आहे, एकंदरीत या भागाला पारंपारिक व मनमोहक निसर्गसौंदर्य लाभलेले आहे. खास करून ट्रेकिंग लव्हर ला सतत खुणावणारे हरिहरगड आणि हरीश्चंद्रगड यांसारखी गिरी शिखरे याच भागात वसलेली आहेत.





सर्वात महत्वाचा मुद्दा सांगायचाच राहून गेला .....

ते म्हणजे कळसुबाई च्या उंचीबद्दल, समुद्रसपाटीपासून पाच हजार चारशे फूट (५४००) म्हणजेच साधारणता एक हजार सहाशे सेचाळीस (१६४६) मीटर उंचीच हे सह्याद्री पर्वतरांगेतील सर्वात उंच शिखर, महाराष्ट्राच माउंट एवेरेस्ट म्हणून ओळखल जात. तसं पाहिलं तर सह्याद्रीच्या पर्वतरांगेत पाच हजार ( ५००० ) फुटापेक्षा अधिक उंची असलेली तीनच शिखरे आहेत, त्यात पहिल्या क्रमांकाला कळसुबाई (५४०० फुट), दुसऱ्या क्रमांकावर साल्हेर वरील परशुराम मंदिराचे शिखर (५१४१ फुट) आणि तिसरा क्रमांक लागतो तो म्हणजे घनचक्कर च्या मुडा (५०२६ फुट ) शिखराचा.



शिखराच्या पायथ्याशी पोहोचलो आणि सर्व तयारी करून ध्येयाच्या दिशेने निघालो. सततचा पाऊस चालूच होता, पावसापासून स्वतःच सौरक्षण करण्यासाठी प्रत्येकाने आपापली हत्यारे बाहेर काढली. त्यात शुभम ने तर कहरच केला, त्याच हत्यार थोडंसं वेगळंच होतं, अर्थातच पावसापासुन सौरक्षण करण्यासाठी त्याने प्लास्टिक च्या पिशवीने सर्व अंग झाकून घेतलं होतं. ठीक १० वाजून ०८ मिनिटांनी आम्ही शिखराच्या दिशेने जाणारी पाऊलवाट तुडवायला सुरवात केली, सुरवातीलाच अशोक आणि गोविंदा ला त्याचं थंडीपासून सौरक्षण

करणारं सामान भेटलं होतं त्यामुळेच कि काय ते दोघेही मस्त आनंदात होते, अर्थातच त्याचं या गोष्टीशिवाय शिखरावर चढणं मला तरी शक्य वाटत नव्हतं.



पावसासोबत थंडीचाही जोर वाढतच होता, डोंगरावरून पडनाऱ्या धबधब्याची आणि वाहत्या पाण्याची पातळी वाढतच होती, वाटेत गावाच्या बाहेर पडल्यावर एक ओढा ओलांडावा लागतो. पावसामुळे ओढादेखील तुडुंब भरून वाहत होता, कसाबसा एकमेकांना आधार देत छातीएवढ्या पाण्यातून वाट काढत आणि एकमेकांना सावरत आम्ही तो ओढा सरतेशेवटी पार केला. आत्ता मात्र सगळेच पुरते ओलेचिंब म्हणजेच वातावरणातील परिस्तिथीशी एकजीव झाले होते. हा ओढा पार केल्यावर अर्थातच शिखराची खरी सुरवात होते.

लाल मातीच्या चिखलात पावलांचा पच-पच आवाज करत चालायला सर्वांनाच भरपूर मजा येत होती, अमोल मात्र खूपच उत्साहित झाला होता सर्व ग्रुपला सोडून एकट्याची सावरी मात्र सर्वात पुढे होती, बघता बघता चढण चालू झाली. सुरवातीलाच घनदाट जंगल लागते. जंगलामध्ये सहजपणे ओळखता येईल अशी निसरडी पाऊलवाट शोधत पुढे-पुढे चालतच होतो.



आंबा, जांभूळ, करवंद, बेहडा, खारवेल, आवळा, सावर, इ. वनस्पतीची झाडे घनदाट जंगलाच्या भयानकतेत भर टाकत होते, तर कोकिळा, आणि इतर विविध पक्ष्यांचे मंत्रमुग्ध आवाज कानाला प्रसन्न करत होते, पलीकडेच शिखरावरून पडणाऱ्या धबधब्याच्या आवाजाने सर्वांचे लक्ष वेधले होते. हाच मनमोहक आवाज कानात साठवत, आणि पडत्या पावसाचे थेंब अंगावर घेत प्रत्येकजण शिखराच्या दिशेने चालतच होता.

काही अंतर पार करून गेल्यावर पुढे जंगलात एक कळसुबाईच नवीन मंदिर लागेल. गावकऱ्यांनी हे मंदिर शिखराच्या पायथ्याशी नव्याने बांधले आहे, ज्या लोकांना शिखरावर जाने शक्य नाही त्यांच्या सोईसाठीच या मंदिराची उभारणी केलेली आहे.




मंदिराच्या शेजारीच चहा व नाश्त्याचे छोटे हॉटेल दिसतील. मंदिरात दर्शन घेऊन आम्ही दोन मिनिट विश्रांती घेतली, आता मात्र काहीजण चालून चालून थोडेफार दमले होते, अगदी मीसुद्धा. प्रत्येकाची हि पहिलीच ट्रेक होती.

कळसुबाईबद्दल एक आख्यायिका सांगितली जाते ती म्हणजे, पूर्वीच्या काळात कळसुबाई हि एक गावातील कोळ्याची मुलगी होती, तिला बऱ्यापैकी वनस्पतीबद्दल माहिती होती, गावातील कोणी एक गृहस्थ आजारी पडला तर ती वरती जंगलात जाऊन वनस्पतीपासून औषध बनवून त्या रोग्याला बर करायची, नंतर पुढे कळसुबाई च्या मृत्यूनंतर तिच्या स्मरणार्थ या शिखराला कळसुबाई हे नाव दिले गेले.

दोन मिनिटांच्या विलंबनानंतर आम्ही पुढची वाट धरली, पावले हळू-हळू पडत होती, जंगलात मध्येच उतरती भाताची शेती नजरेस पडायची, तर कुठे भयाण जंगलातून चालण्याची भीती वाटायची.

तेवढ्यात तुषारने पाठीमागून आवाज दिला , त्याला वरती शिखराच्या टोकाकडे आणि घनदाट जंगल पाहून भयानक भीती वाटायला लागली होती.

शेवटी त्यानं वरती न येण्याचा निर्णय घेतला. तो इथेच खालच्या मंदिरात बसून राहणार होता. त्याची मंदिरात थांबण्याची व्यवस्था करून आम्ही पुढच्या दिशेने मार्गस्थ झालो.

वाटेत आमच्या सारखीच भटकंती करणारे ट्रेकर्स भेटत होते, पण म्हणावी अशी गर्दी बिलकुल नव्हती, अगदीच जेमतेम म्हणजेच चार ते पाच ग्रुप आमच्या सारखाच सह्याद्रीचा आनंद लुटण्यास आले होते. वाटेत ठिकठिकाणी चहा आणि नाश्त्याची सोई गावकऱ्यांनी केलेली दिसत होती, पण आम्हाला थोडीशी चुकीची माहिती मिळालेली की, शिखरावर तुम्हाला कुठेच पाणी अथवा जेवण मिळणार नाही. आणि या चुकीच्या माहितीच्या आधारेच आमच्यापैकी कोणीच सोबत पैसे ठेवलेले नव्हते.

पडत्या पावसात मोबाईल आणि पैसे सोबत बाळगणे थोडेसे धोकादायक होतेच, कोणीच सोबत मोबाईल घेतले नव्हते. अर्थातच आयुष्यातले अविस्मरणीय क्षण मोबाईल्च्या कॅमेऱ्यात कैद करता आले असते, याचे पुरेपूर भान ठेवून मी एका प्लास्टिक च्या पिशवीमध्ये व्यवस्थित गुंडाळून माझा मोबाईल खिशात टाकला होता. मोबाईल वरती घेऊन जाणे धोक्याचे आहे हे माहित असूनदेखील मी हे धाडस दाखविले होते. कारण नजरेस भुरळ पडणाऱ्या या क्षणांचे साक्षीदार म्हणून मला ते सारे दृश्य माझ्या कॅमेऱ्यात कैद करायचे होते. आणि गंमत अशी की , मोबेईल ची चार्जिंग पुरती संपून गेली होती. काहीही करून मला ही १५% चार्जिंग खाली येईपर्येंत टिकवायची होती.

ओढ्याच्या अलीकडे गावाच्या दिशेला आंब्याच्या झाडाखाली सुरवातीला एक ग्रुप फोटो आणि कळसुबाई च्या नवीन मंदिराजवळ एक फोटो घेऊन मी मोबेईल बंद करून ठेवला, पण धुक्याच्या प्रभावामुळे कॅमेऱ्याच्या आतमध्ये लेन्स वरती देखील धुक्याचा शिरकाव झाला होता, त्यामुळेच की काय फोटो व्यवस्थीत येत नव्हते.




आत्ता मात्र सगळेच थकले होते, प्रत्येकाची पावले मंदावली होती. शिखराच्या दिशेने पाहिले तर माथा काही केल्या दर्शन देत नव्हता. समुद्रसपाटीपासून साधारणता ६०० मीटरच्या अंतरावर आम्ही होतो, चुकून गोविंदच्या आणि राहुलच्या खिशात कसेबसे मिळालेल्या ७० रुपयामध्ये कडाक्याच्या थंडीत आणि पडत्या पावसात गरमागरम चहाचा स्वाद घेता आला. खरं तर या चहाची चव कुठल्याही पंचतारांकित हॉटेलच्या चहाला लाजवेल, आणि अश्या वातावरणात असा दर्जा असणारा चहा पिण्याची मज्जा तर निराळीच.



चहा पीत पीत हॉटेलच्या मालकासोबत चर्चा केली असता अस समजलं की, खरी कसरत तर इथून पुढची आहे, तुम्ही आत्तापर्यंत काहीच कसरत केलेली नाही. खरंच इथून पुढची वाट खूपच अवघड दिसत होती, सपाट चढण आत्ता संपली होती. जमिनीशी ९० अंशामध्ये डोंगरात पाय रोवून उभा असलेला खडक समोर दिसत होता. आणि याच खडकातून वाट काढत वर चढणारे काही ग्रुप आम्हाला मुंगीसमान दिसत होते.

असे हे विहंगम दृश्य मला माझ्या कॅमेऱ्यात कैद करण्याचा मोह अवरता नाही आला, पण नंतर तोच प्रोब्लेम ..... कॅमेऱ्यात धुक्याचा शिरकाव. तरीही कॅमेऱ्यावर जोराची फुंकर मारून धुक्याला दूर करण्यात मला थोडेफार यश आलं. प्रत्येकाला आळीपाळीने उभे करून फोटो घेतले.




आत्ता पुढची कसरत थोडीशी भेडसावत होती, उंचच उंच खडकाच्या कातळामध्ये लोखंडी पायऱ्यावर जीव मुठीत घेऊन शिखर चढायचे होते.

काही जण म्हणतात “काय भेटत या ट्रेकर्सना” ....?????, कशासाठी एवढा अट्टहास .....??? जीवाशी खेळत शिखरे चढण्यापेक्षा घरात बसून आराम केलेला कधीही चांगलाच.

पण हे सगळं बोलणाऱ्या लोकांना, हे स्वर्गसुख अनुभवायला कदाचित मेल्याशिवाय मिळणार नाही, पण ट्रेकर्सना मरणाच्याही आधी स्वर्गातलं सुख नक्कीच अनुभवायला मिळत,

अपवाद फक्त स्वर्गातील अप्सरांचा............ इथ ते मात्र पाहायला नाही भेटणार, अप्सरांना सुद्धा लाजवेल असं निसर्गाच सौंदर्य नक्कीच प्रेमात पाडेल.



प्रत्येक क्षण आणि प्रत्येक दृश्य डोळ्यामध्ये साठवत आम्ही पुढची वाट धरली. वाट थोडीशी अवघड होती, जंगल जवळपास संपलेलं होतं आणि समोर होता तो म्हणजे भलामोठा महाकाय खडक........

याच काळ्या खडकाशी झुंज देत आम्हाला वरती चढायचं होतं.

खडकात लोखंडाच्या शिड्या लावलेल्या आहेत, पण त्याही जरा धोकादायक वाटतात. कारण शिडीची भक्कमता पहावी अशी चांगली नव्हती आणि शिडीवर पाय ठेवण्याची जागा अगदीच अरुंद होती. अनवधानाने जर पाय घसरला तर डायरेक्ट पायथ्याचं तिकीट फिक्स होतं. म्हणून अगदीच बेतानं प्रत्येकाला सोबत घेऊन आम्ही शिड्या पार करत होतो. इथून खाली गावाच्या दिशेने पाहिलं तर डोक गरगरायचं म्हणून कोणीच खाली पाहू नका अस वेळोवेळी सर्वांना सांगितलं जायचं.

साधारणतः सातशे मीटरचा हा महाकाय, भयानक आणि भेडसावणारा खडक पार करायला आम्हाला जवळपास ३५ मिनिटाचा कालावधी लागला. कारण धुक्यातून वाट काढत जीवाशी खेळत वरती चढावं लागत होतं. समोर पांढरशुभ्र धुकं पडलेलं. अगदी सोबतचा व्यक्तीही अंधुकसा दिसायचा. शिखराचा इथून वरचा भाग हा पूर्णपणे आभाळात झाकलेला होता, माथा काही केल्या नजरेस पडत नव्हता. शेवटी खडकाचे कातळ पार केल्यावर एक सपाट जमीन लागली, आणि सगळ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला, सगळ्यांना वाटलं कि आपण पोहोचलो.........

पण तसं काहीच नव्हतं, शिखर आणखी वरती होतं. एका शिलेवर टप्प्याची उंची कोरलेली होती...... १३६५ मीटर.




शरीर थकलेल होतं पण मन मात्र कणखर होतं. काहीही झालं तरी टोकावर जायचं ..... १३६५ मीटर च्या या टप्प्यावर दोन मिनिट झाडाखाली थांबून नंतर वरची वाट धरली, बऱ्यापैकी ३०० मीटर अंतर सर करायचं बाकी होतं. पण हे ३०० मीटर अंतरही खूपच जास्त आणि नकोसं वाटत होतं. पण मनात उम्मीद होती, आणि नाद शांत बसू देत नव्हता, म्हणूनच की काय पावले अपोआप पुढची वाट चालू लागली...पायाचं दुखणंही कडाक्याच्या थंडीमुळं जाणवत नव्हतं, सगळं काही बधीर झालं होतं.

तोंडातून बोलताना ढग बाहेर पडायचे ... अर्थातच धुकं. अगदी काश्मीरमध्ये आल्यासारखा हा अनुभव होता.

इथून पुढची काही अंतराची वाट मात्र थोडीशी निसरडी आहे. चिखलातून पाय सहजपणे घसरू शकतो त्यामुळे विशेष काळजी घेतली पाहिजे. साधारणतः १०० मीटर च अंतर पार करून गेल्यावर पुढे एक विहीर लागते. दगडांनी बांधलेली हि विहीर बऱ्यापैकी खोल आहे, पण पावसामुळे आत्ता ती तुडुंब भरलेली दिसेल. सध्यातरी विहिरीतील पाणी पिण्यायोग्य नसले तरी हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात विहिरीतलं पाणी पिण्यायोग्य असते, वाटेत कुठे पिण्याच्या पाण्याची सोय झाली नाही तरी इथे मात्र शुद्ध आणि थंडगार पाणी तुम्हाला मिळेल. विहिरीच्या शेजारीच दोन हॉटेलं तुम्हाला दिसतील, गरमागरम भजीचा खमंग वास या हॉटेलमधून येत होता, याच हॉटेलमध्ये तुम्हाला चहा, भजी, मॅगी आणि वडापावचा आस्वाद घेता येईल. पावसाळ्याच्या दिवसात सर्वांना आवडणारी मक्याची कणसं ही नक्कीच खायला मिळतील. (आमचे खिसे इल्ला असल्यामुळे आम्ही वासावरच समाधान मानलं)

जवळपास चौदाशे मीटर पर्येंत गावातील लोकांनी पर्यटकांच्या सोयीसाठी हॉटेल उभारलेली आहेत. बाराही महिने हि हॉटेल चालू असतात. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे हे लोक दररोज तेवढ अंतर पार करून वरती येतात, खरोखरच आश्चर्य.....

आम्ही विचार करायचो कि आपल्याला फक्त स्वतःचं वजन घेऊन इथं येणं शक्य नव्हतं, तर हे लोक दररोज हॉटेलसाठी लागणारं एवढं सामान घेऊन कसेकाय वरती येत असतील देव जाने..



तुम्हाला वाटेतून येताना काळ्या रंगाच्या दोन केबल तुमचा पिछा करताना दिसतील, या केबल बाकी कशाच्या नसून, महाराष्ट्र पर्यटन विभागानं कळसुबाईच्या अगदी टोकापर्येंत लाईटची सोय केलेली आहे.

खालच्या कातळात लोखंडी पायऱ्या ह्या वीस वर्ष्यापुर्वी लावण्यात आलेल्या आहेत, पण त्या पायऱ्या लावण्याआधीही बरेच गिर्यारोहक आणि गावकरी शिखरावर जात असायचे, खरोखरच विचार केला पाहिजे की लोखंडी पायऱ्या लावण्याच्या अगोदर खडकाचा हा भाग पार करणं किती आव्हानात्मक असेल.

साधारणतः चौदाशे मीटरचं हे अंतर पार केल्यानंतर तुम्हाला दगडी पायऱ्या लागतील, या पायऱ्या चढण्यासाठी सोप्प्या आहेत. आत्ता मात्र सगळ्याच गोष्ठीमध्ये वाढ होताना दिसेल, अर्थातच थंडी, पाऊस, धुकं, आणि वाऱ्याचा वेगसुद्धा. ताशी पन्नास किलोमीटर वेगाने वारा वाहू लागला होता. या सोसाट्याच्या वाऱ्याचा सामना करत तुम्हाला चढण चढावी लागते,

पुढे दगडाच्या पायऱ्या सर केल्यावर एक छोटा धबधबा लागतो, स्वच्छ काळ्याशार खडकावरून वाहणाऱ्या या धबधब्याचे पाणी बर्फ़ासारखंच थंडगार होते. एवढ्या थंड पाण्यात अंघोळ करण्याचा मोह सर्वांनाच झाला होता. आधीच पुरते गारठून गेलेलो त्यामुळे या पाण्यात अंघोळ करणं फारसं अवघड वाटत नव्हतं, शेवटी मनोहर आणि अजयन न राहवून या धबधब्याचा आनंद घेतलाच.



पावसाळ्यात शिखरावर दरदोज दोन ते चार मिलीमीटर एवढा पाऊस पडतो, शिखरावरून बरेचसे धबधबे बारी गावाच्या दिशेने पडतात. तर कधी धबधबे मधेच गुडूप होतात, कारण ताशी पन्नास किलोमीटर वेगाने वाहणारे वारे धबधब्याला जमिनिपर्येंत पोहोचू देत नाही, ते धबधबे उलट्या दिशेने वाहतात. म्हणजेच वाऱ्याच्या दिशेने वरती पावसाच्या रुपात शिखरावरच पडतात.

थोडंसं वरती चालून आल्यावर आणखी एक भयानक खडक लागतो. खूप वेळ चालूनही शिखराचा माथा काही आम्हाला जवळ करत नव्हता. सगळेजण एकच वाक्य बोलू लागले होते, “आणखी किती चालायचं”..?? १३६५ मीटर उंचीच्या टप्प्यापासून पुढे जवळपास

३०० मीटरचा पल्ला गाठायला आम्हाला भलताच वेळ लागला होता, कारण वातावरण बदलत होतं, आणि शरीर पण थकलेल्या अवस्थेत वातावरणाशी मिळतंजुळतं करून घ्यायला वेळ लावत होतं.

हा खडक पार करण्यासाठी भलतीच लांब आणखी एक लोखंडी शिडी लागेल, हीच ती शिखरावरची शेवटची शिडी. शिडीच्या अर्ध्यापर्येंत गेल्यावर गावाच्या दिशेने खडकात कोरलेली दोन पावले दिसतील, आणि हीच ती कळसुबाई ची पावले, गावकरी या पावलांची पूजा करतात. पुढे शिडी पूर्णपणे पार केल्यावर तुम्ही पोहोचता महाराष्ट्राच्या एवेरेस्टवर....

ती वेळ होती १२ वाजून २३ मिनिटांची.........होय हेच ते ठिकाण जे आम्हाला खुणावत होतं.

आत्ता शरीरातला थकवा पूर्णपणे निघून गेला होता, सगळ्यांनीच अगदी सुटकेचा निश्वास सोडला. हात पाय बधीर झाले होते, शांत निरागस डोळ्यांनी सगळं दृश्य डोळ्यात साठवत होतो, दोन मिनिट सगळेजण एकदम शांत, कसलाच आवाज नाही... फक्त वेगाने वाहणारा वारा कानात काहीतरी सांगून जात होता, सोबतीला शिखरावरून पडणाऱ्या धबधब्याचा आवाज आणि जोरजोरात धडकणारं हृदय बस एवढंच .....

सर्वांनी दोन मिनिट सगळं दृश्य डोळ्यात साठवून ठेवल, वाऱ्याचा वेग जास्त असल्यामुळे, एकट्याला आधाराविना उभा रहाणं थोडंसं मुश्कील होऊन जातं.

समोर दिसत होतं एक छोटंसं भगव्या रंगाचं मंदिर.......



तीनशे पासष्ट दिवस, बारा महिने, आणि चोवीस तास उन वारा आणि पावसाशी झुंज देत आजतागायात उभ असलेल हे कळसुबाईचं अगदीच छोटंसं मंदिर.

मंदिरात एकवेळा फक्त दोनच व्यक्ती प्रवेश करू शकतात, मंदिरात जाऊन दर्शन घेताना मात्र मोबेईल काढून हा अविस्मरणीय क्षण मी कैद केला होता. पण मंदिराच्या बाहेर फोटो काढण कदापि शक्य नव्हतं. कारण वाऱ्याचा वेग खूपच वाढला होता. साधारणतः ताशी साठ किलोमीटर वेगाने वाहणारा वारा विशेष लक्ष वेधून घेत होता, पांढऱ्याशुभ्र धुक्यातून समोरचं दृश्य पाहणं अवघड होतं.













हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात धुकं कमी प्रमाणात पडत, त्यामुळे या ऋतूमध्ये कळसुबाई चा खरा आनंद तुम्हाला घेता येईल.

आम्ही आत्ता महाराष्ट्राच्या सर्वात उंच ठिकाणी होतो, बाकीची दुनिया खूपच छोटी वाटायला लागते...... खरोखरच या विश्वापुढे माणूस एका बिन्दुसम आहे, हि वास्तविकता समजेल.

कळसुबाईच्या चाहुबाजूस सह्याद्रीची गिरी शिखरे पहावयास मिळतात. प्रामुख्याने रतनगड, हरिहर, गोदावरीचे उगमस्थान आणि भगवान शंकराचे वास्तव्य असलेले ब्रम्हगिरी, याच ब्रम्हगिरी पर्वतापासून सह्याद्रीच्या डोंगररांगेची सुरवात होते. तसेच रामभक्त हनुमानाचे जन्मस्थान असलेला अंजेनेरी, उत्तरेकडे औंढा, पट्टा, रामसेज, घरगड, बहुला, त्रिलिंगवाडी, कवनाई या गडाचे विहंगमय दृश्य कळसुबाई वरून पहावयास मिळते.

तसेच सह्याद्रीतील सर्वात कठीण असलेले ट्रेकिंगचे त्रिकुट, अलंग-मलंग-कुलंग हि शिखरे सुद्धा समोरच दिसतील. पण धुक्यामुळे हे दृश आम्हाला पहावयास मिळाले नाही, शिखरावरून भंडारदऱ्याचा अथांग सागर विशेष लक्ष वेधून घेईल. सोबतीला अचला, अहिवंत, माहुली, हे इतिहासाची पाठराखण करणारे किल्ले दिसतात.

कळसुबाई च्या मंदिरासमोर खडकात रोवलेले एक त्रिशूल आणि त्याला लटकवलेली घंटा आहे, वाऱ्याच्या प्रभावामुळे हि घंटा अपोआप नाद करते हे विशेष..... एवढ्या भयानक वाऱ्यामध्ये मंदिराला प्रदक्षिणा घालणे धोक्याचेच पण तो धोका पत्कारत आणि मंदिराच्या भिंतीचा आधार घेत मंदिर प्रदक्षिणा घातलीच.

शिखराच्या माथ्यावर विशेष काळजी घेतली पाहिजे , पावसाळ्यात बरेचजण रेनकोट आणि छत्री सोबत घेऊन येतात, पण माथ्यावर आल्यावर छत्री बंद करून ठेवावी, व रेनकोट वाल्यांनी रेनकोटची सर्व बटने व्यवस्तीत लावलीत याची खात्री करावी. कारण वाऱ्याचा वेग रेनकोट सोबत तुम्हालाही घेऊन जाऊ शकतो.

थोडा वेळ सर्वांनी या स्वर्गसुखाचा आनंद घेतल्यानंतर आमचा १२ वाजून ३५ मिनिटांनी "हर हर महादेव" आणि "आई कळसुबाई च्या नवान चांगभलं" चा गजर करत उतरणीचा प्रवास सुरु झाला. शिखरावरून खाली उतरताना एक भला मोठा साखळदंड आहे, उतरण्यासाठी आधार म्हणून तो लावलेला असावा. चढण्या पेक्षा उतरणीचा प्रवास लवकर होतो, थोडीशी जास्त भीतीही वाटते. कारण उतरत्या प्रवासात तुम्हाला खोलच खोल दिसणाऱ्या आणि डोळे फिरवणाऱ्या दऱ्या नजरेस पडतात. अशा वेळेस खाली न पाहता एकदम एकाग्रतेने उतरलं पाहिजे, लोखंडाच्या पायऱ्यावरून पाय घसरणार नाही याची विशेष काळजी घ्यावी.

उतरणीच्या प्रवासात मात्र सगळ्यांच्या पोटात कावळे ओरडत होते, खूपच जोराची भूक लागली होती. पुढे एक टप्पा गाठून सोबत आणलेले फरसाण आम्ही काही क्षणातच फस्त केले, आणि पाणी पिऊन पुढची उतरणीची परिक्रमा चालू ठेवली. बारा वाजून गेले होते तरी सूर्य दिसत नव्हता, पावसाळ्यातील काही दिवस सोडून हिवाळ्यात उन सावलीचे खेळ तुम्हाला इथ पहावयास मिळतील, तसेच सूर्योदय आणि सूर्यास्थ देखील विशेष विलोभनीय असतो.

उतरता उतरता आपल कर्तव्य म्हणून काही याडपाट लोकांनी शिखरावर केलेला कचरा आम्ही गोळा केला होता. आपली संस्कृती जपली तर पाहिजेच पण ती स्वच्छ सुद्धा ठेवली पाहिजे हे सर्वांच्या लक्षात कधी येईल देव जाने... शिखरावर ठिकठिकाणी शाशनाने "कचरा करू नये" असे बोर्ड लावलेले आहेत तरीसुद्धा काही माजलेले लोक इथ येऊन दारू

पिण्यापासून ते दगडावर आणि भिंतीवर स्वताच आणि स्वताच्या बहिणीच नाव कोरून प्रदर्शन करणाऱ्या लोकांचा खरच खूप राग येतो. बहुतेक यांच्या रक्तातच संस्कारांची कमतरता असते. असो..... पण आपले गड किल्ले आणि इतिहास सुरक्षित ठेवण्यासाठी प्रतेकाणच योगदान दिल पाहिजे.



शेवटी साधारणतः दीड तासात आम्ही शिखराचा पायथा गाठला होता. उतरण्यासाठी शक्ती आणि वेळसुद्धा कमी लागतो, पायथ्याला बारी गावात उतरल्यावर मंदिरात कपडे बदलून आम्ही पुढील प्रवासाठी सज्ज झालो.

पुढचा पल्ला गाठायचा होता तो म्हणजे हरिहर गड, अंजेनेरी, आणि ब्राम्ह्गीरीचा....

-शुभम खोत


महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर
कळसुबाई शिखर
महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर
समुद्र सपाटीपासुन उंची.
1646 मीटर.



# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि मराठी व जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील प्रकाशनाच्या जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान